10 JAN 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक धोरणाबाबत सकारात्मकता हवी

## कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के



गडहिंग्लज : नव्या धोरणामुळे बंधनमुक्त, रोजगारक्षम शिक्षण निर्माण केले आहे. या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शिक्षकांनी सकारात्मकतेने पहावे असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.


मधुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली येथे आयोजित शिवाजी विद्यापीठ आणि रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्यावतीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर आयोजित जिल्हास्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. लता देशपांडे होत्या.

यावेळी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० सुकाणू समिती सदस्य प्रा. डॉ. माधव वेलिंग यांनी मार्गदर्शन केले. रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हनकर यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. संचालक आर. एस. निळपणकर, दत्ता पाटील, किरण पोतदार, महेश मजती, डी. के. मायदेव, आर. जी. कुलकर्णी, रमेश चराटे, सतीश हेरवाडे, श्रेयस गाडवे आदी उपस्थित होते. प्रा. अस्मिता केळकर यांनी सुत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2024
पुढारी

# न्या. सुधीर कुलकर्णी शिवाजी विद्यापीठाचे पहिले लोकपाल

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश (सेवानिवृत्त) सुधीर पुरुषोत्तम कुलकर्णी यांची शिवाजी विद्यापीठाच्या प्रथम लोकपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), नवी दिल्ली यांच्या ११ एप्रिल २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार सर्व विद्यापीठांमध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष व लोकपाल नियुक्ती करण्याचे आदेश आहेत. त्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी तक्रार पान ८ वर

## न्या. सुधीर कुलकर्णी शिवाजी विद्यापीठाचे पहिले लोकपाल


(पान १ वरून) निवारण कक्षाच्या निकालाबाबत अपिलीय अधिकारी व लोकपाल म्हणून निवृत्त न्या. सुधीर कुलकर्णी यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्या नियुक्तीस त्यांनी स्वीकृती दर्शविली आहे. न्या. कुलकर्णी यांनी बी.एस्सी. (ऑनर्स) व एल.एल.एम. पदवीनंतर मार्च १९८८ मध्ये अहमदनगर येथे विधी सेवा रुजू केली. नांदेड येथून मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीशपदावरून ते सप्टेंबर २०१८ मध्ये निवृत्त झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2024
लोकमत

# न्या. सुधीर कुलकर्णी विद्यापीठाचे लोकपाल

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्रथम लोकपालपदी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश (निवृत्त) सुधीर पुरुषोत्तम




कुलकर्णी यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) यांच्या ११ एप्रिल २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार सर्व विद्यापीठांमध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष व लोकपाल नियुक्ती करण्याचे आदेश दिले आहेत.

त्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी विद्यापीठाच्या विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या निकालाबाबत अपिलीय अधिकारी व लोकपाल म्हणून निवृत्त न्यायमूर्ती सुधीर कुलकर्णी यांची नियुक्ती केली. नांदेड येथून मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश पदावरून ते सप्टेंबर २०१८ मध्ये निवृत्त झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठाच्या लोकपालपदी कुलकर्णी



सुधीर कुलकर्णी

कोल्हापूर : प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश (सेवानिवृत्त) सुधीर पुरुषोत्तम कुलकर्णी यांची शिवाजी विद्यापीठाच्या प्रथम लोकपालपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी दिली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ११ एप्रिल २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार सर्व विद्यापीठांमध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष व लोकपाल नियुक्ती करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार कुलगुरूंनी शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या निकालाबाबत अपिलीय अधिकारी व लोकपाल म्हणून निवृत्त न्यायाधीश कुलकर्णी यांची नुकतीच नियुक्ती केलेली आहे. या नियुक्तीस त्यांनी स्वीकृती दर्शविली आहे. न्यायाधीश कुलकर्णी यांनी बी.एस्सी. (ऑनर्स) व एल.एल.एम. पदवीनंतर मार्च १९८८ मध्ये अहमदनगर येथे विधी सेवा रुजू केली. नांदेड येथून मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश पदावरुन ते सप्टेंबर २०१८ मध्ये निवृत्त झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2024
लोकमत

# खानापूर उपकेंद्रासाठी विद्यापीठ समितीची पाहणी

## 'टेंभू'च्या कार्यालयात सुरू करण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

विटा/खानापूर : शिवाजी विद्यापीठाच्या खानापूर येथे होणाऱ्या उपकेंद्राच्या जागेची पाहणी मंगळवारी उपकेंद्राबाबत नेमलेल्या समितीने केली. यावेळी समितीने खानापूर येथे प्रत्यक्ष जाऊन उपलब्ध राष्ट्रीय महामार्गालगतची जागा, पाण्याची व्यवस्था, दळणवळण सुविधांचा विचार करून ही जागा उपकेंद्रासाठी योग्य असल्याचे मत नमूद केले. यावेळी अभिसभा सदस्य माजी नगराध्यक्ष वैभव पाटील व मेघाताई गुळवणी यांनी खानापूर येथे टेंभू योजनेच्या जुन्या बंद असलेल्या इमारतीत जूनपासून विद्यापीठ उपकेंद्राचे काम तात्पुरत्या स्वरूपात सुरू करावे, अशी मागणी केली.

खानापूर येथे विद्यापीठाचे उपकेंद्र होण्याबाबत अधिसभा सदस्यांच्या बैठकीत प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. त्या पार्श्वभूमीवर उपकेंद्राबाबत नेमलेल्या समितीचे सदस्य बुधवारी सकाळी खानापुरात दाखल झाले. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन शिंदे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुहास शिंदे यांच्यासह शिवसेनेचे दादा भगत यांनी समितीचे स्वागत केले. त्यानंतर समितीने उपलब्ध असलेल्या तेथील जागेची पाहणी केली.

दरम्यान, खानापूरच्या टेंभू कार्यालयातील वापरात नसलेल्या इमारतीची पाहणीही यावेळी समितीने केली. उपकेंद्र सुरू करताना सुरुवातीच्या काळात तेथील इमारत वापरण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनास देऊन येत्या जूनपासून हे उपकेंद्र खानापूर येथे सुरू करण्यासाठी समिती प्रयत्नशील राहील, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ अभिसभा सदस्य ॲड. वैभव पाटील यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2024
पुढारी

# हिवाळी सत्र परीक्षेला ३,३६३ विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला सुमारे ३ हजार ३६३ विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ फार्मसी, बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग, बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल), बॅचलर ऑफ लॉ (फाईव्ह इअर) आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. दरम्यान, दि. ९ रोजी एमसीए (इंजिनिअरिंग), बी. टेक., आदी अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. आजअखेर ५६७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

10 JAN 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पीएच.डी. प्रवेश परीक्षा तयारीसाठी अभ्यासात सातत्य हवे

## डॉ. प्रकाश पवार

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



पीएच.डी. प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी अभ्यासात सातत्य महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे पीएच.डी. प्रवेश परीक्षेसाठी 'पीएच.डी. प्रवेश परीक्षा तयारी' या विषयावर ऑनलाईन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते. उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुवल, सी. एस. कोतमिरे उपस्थित होते.

प्रा. डॉ. पवार म्हणाले, पीएच.डी प्रवेश परीक्षेची तयारी करताना आवश्यक विषय व संशोधन पद्धती यांचा साकल्याने अभ्यास केला पाहिजे. क्रमिक पुस्तकांचा अभ्यास केला पाहिजे. त्यातील आशय समजून घेणे महत्त्वाचा आहे आणि त्यासाठी वापरली गेलेली संशोधन पद्धती अभ्यासली पाहिजे.

प्रा. डॉ. मोरे म्हणाले, पदव्युत्तर शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांनी संशोधन करण्याची तयारी ठेवली पाहिजे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी संशोधन वृत्ती बाळगली पाहिजे. समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख डॉ. प्रकाश बेळीकट्टी करून दिली. डॉ. प्रवीण लोंढे यांनी सूत्रसंचालन केले. सचिन भोसले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2024
सकाळ

# विद्यापीठात आज प्लेसमेंट ड्राइव्ह

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात एलिक्सिर कन्सल्टंट्स यूके लिमिटेडतर्फे आज प्लेसमेंट ड्राईव्ह होणार आहे. रासायनिक अभियांत्रिकी विभाग आणि एलिक्सिर कन्सल्टंट्स यांच्यातील या सहकार्याने या संधीचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्लेसमेंट ड्राइव्हचे उद्दिष्ट विभागातील पदवीधर आणि माजी विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आहे. ही संधी शैक्षणिक आणि उद्योग यांच्यातील दरी कमी करण्याकामी उपयोगी ठरेल, असे व्यवस्थापकीय संचालक विश्वास शिंदे यांनी सांगितले.

10 JAN 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 89 प्रजातींच्या 774 पक्ष्यांची नोंद

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

बर्डस् ऑफ कोल्हापूर आयोजित कोल्हापूर पक्षी गणनेच्या पाचव्या हंगामातील सातव्या भागाची पक्षी गणना शिवाजी विद्यापीठ परिसरात नुकतीच झाली. यात ८९ प्रजातींच्या ७७४ पक्ष्यांची नोंद करण्यात आली. यात १६ स्थलांतरित प्रजाती, २ स्थानिक-स्थलांतरित, ७१ रहिवासी प्रजातींचा समावेश आहे.

- १६ स्थलांतरितांसह ७१ रहिवासी प्रजातींचा समावेश; शिवाजी विद्यापीठ पक्षीगणना



नॉर्थन शॉवलर (थापट्या बदक)



रेड ब्रेस्टेड फ्लायकॅचर (लाल छातीचा मासेमार)



एशियन ओपनबील (उघड्या चोचीचा करकोचा)

(सर्व छाया : प्रणव देसाई)

## स्थलांतरित पक्षी असे...

ग्रीन-विंग टील (चक्रांग), नॉर्थन शॉवलर (थापट्या बदक), वूड सांडपायपर (कवड्या तुतारी), कॉमन सांडपायपर (सामान्य तुतारी), ब्राऊन श्राइक (तपकिरी खाटीक), एशी ड्रोंगो (राखी कोतवाल), रेड ब्रेस्टेड फ्लायकॅचर (लाल छातीचा माशीमार), टायगा फ्लायकॅचर (लाल कंठाची माशीमार), ब्लिथस रीड वॉब्लर (ब्लिथचा वेळू वटवट्या), साईक्स वॉब्लर (साईक्सचा वटवट्या), बुटेड वॉब्लर (पायमोज वटवट्या), ट्री पीपीट (वृक्ष तिरचिमणी), वेस्टर्न यल्लोव वॅगटेल (पिवळा धोबी), ग्रे वॅगटेल (करडा धोबी), व्हाईट वॅगटेल (पांढरा धोबी).



कॉमन किंगफिशर (सामान्य धिवर)

## आययूसीएन संकटग्रस्त यादीतील प्रजाती

इंडियन रिव्हर टर्न (नदी सुरय), वुली नेक स्टॉर्क (पांढऱ्या मानेचा करकोचा).

## पर्यावरणशास्त्र विभागाचा सहयोग

पक्षी गणना शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या सहयोगाने घेतली. विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांच्या सहकार्याने कोल्हापूरचे, वाईल्डलाईफ वॉर्डन स्वप्नील पवार, बर्डस् ऑफ कोल्हापूरचे प्रणव देसाई, सतपाल गंगणमाले, हिमांशू स्मार्त यांच्या मार्गदर्शनाखाली अभिषेक शिर्के, पृथ्वीराज सरनोबत, मंदार रुकडीकर, ऋतुजा पाटील व सचिन कांबळे यांनी सहभाग घेतला. पक्षी गणनेच्या आठवा भाग दि. १४ रोजी सकाळी टॉवर येथे होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2024
पुढारी



कोल्हापूर : चेन्नई येथे होणाऱ्या खेलो इंडिया फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र झालेला शिवाजी विद्यापीठाचा संघ. सोबत प्रशिक्षक अभिजीत वणिरे, सहायक प्रशिक्षक प्रा. अमर सासने.

# शिवाजी विद्यापीठ फुटबॉल संघ 'खेलो इंडिया' स्पर्धेसाठी पात्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जालंधर (पंजाब) येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत दमदार कामगिरी करत कोल्हापूरचा शिवाजी विद्यापीठ संघ चेन्नई (तामिळनाडू) येथे होणाऱ्या राष्ट्रीय खेलो इंडिया स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

आंतरविद्यापीठ स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीतील सामन्यात शिवाजी विद्यापीठाने पश्चिम बंगालच्या बलाढ्य बरद्वान विद्यापीठाचा ३-२ अशा गोल फरकाने पराभव करून पहिल्या आठ संघांत स्थान मिळवले. सामन्यात सुरुवातीलाच दोन गोलचे ओझे घेऊन खेळणाऱ्या शिवाजी विद्यापीठाने मध्यंतरापर्यंत सामना २-२ असा बरोबरीत आणला. आदित्य कल्लोळी व प्रथमेश हेरेकरने गोलची परतफेड केली. उत्तरार्धात प्रभू पोवार, हेरेकर, संकेत मेढे, आदित्य कल्लोळी, सिद्धेश साळोखे, यश कांबळे यांनी आक्रमक चाली रचल्या. ६५ व्या मिनिटाला आदित्य कल्लोळीने गोल नोंदवत संघाला ३-२ अशी आघाडी मिळवून दिली. या गोलची परतफेड बरद्वानच्या संघाला अखेरपर्यंत करता आली नाही. शिवाजी विद्यापीठाचा गोलरक्षक अनिल जानकरने उत्कृष्ट कामगिरी केली. दरम्यान, उपांत्यपूर्व सामना दि. १० जानेवारी रोजी होणार आहे.

**शिवाजी विद्यापीठाचा संघ असा :** शिवाजी विद्यापीठाच्या संघात कर्णधार प्रथमेश हेरेकर, स्वयम साळोखे, ऋतुराज संकपाळ, ऋतुराज सूर्यवंशी, तेजस शेळके, यश देवणे, विशाल पाटील, साहिल खोत, यशराज कांबळे, रोहित पोवार, प्रभू पोवार, संकेत जरग, आदित्य कल्लोळी, देवराज मंडलिक, आविष्कार राऊत, अनिल जानकर, संकेत मेढे, निरंजन कामते, सिद्धेश साळोखे यांचा समावेश आहे. सर्वांना प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे, सहायक प्रशिक्षक प्रा. अमर सासने, व्यवस्थापक डॉ. शिवराज गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2024
पुढारी



कोल्हापूर : अखिल भारतीय शूटिंग स्पर्धेसाठी निवड झालेला शिवाजी विद्यापीठाचा संघ. सोबत प्रशिक्षक नीलेश पाटील व डॉ. धनंजय पाटील.

# विद्यापीठाचा संघ अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कुरुक्षेत्र हरियाणा येथे झालेल्या साऊथ वेस्ट इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मिक्स पिस्तल मिक्स शूटिंग संघाला रौप्यपदक मिळाले. संघाची निवड फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या अखिल भारतीय विद्यापीठ शूटिंग स्पर्धेसाठी झाली आहे. यात १२५ विद्यापीठांतील ३२७ खेळाडूंचा सहभाग आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या संघात फिझा देसाई (१८८ गुण, छ. शहाजी महाविद्यालय ), श्रेयस उपाध्ये (१८९ गुण, के. एस. डब्लू, कॉलेज सांगली), तेजस ढेरे (पिस्तल, भोगावती महाविद्यालय, कुरूकली), आदित्य साळुंखे (डी. आर. के. कॉलेज), सुमेध सासने, प्रतीक जोंग (लहू बाळा महाविद्यालय, पनुरे), समर्थ मंडलिक, रोहन हुजरे (भोगावती महाविद्यालय), कनक शिंदे (डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर), लावण्या नलवडे (राजाराम कॉलेज) यांच्यासह प्रशिक्षक डॉ. नीलेश पाटील (राधानगरी महाविद्यालय) व डॉ. धनंजय पाटील (आजरा महाविद्यालय) यांचा समावेश आहे. सर्वांना कुलगुरू डॉ. डी टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2024
पुण्यनगरी

# मल्लखांब स्पर्धेत शिवराजच्या दोन खेळाडूंना सुवर्णपदक

गडहिंग्लज : प्रतिनिधी

जयपुर राजस्थान येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या संघाने पिरॅमिड प्रकारात सुवर्णपदक पटकावले.



शिवाजी विद्यापीठाच्या सहा मुलींच्या संघामध्ये शिवराज महाविद्यालयाच्या समीक्षा गावडे आणि प्राजक्ता गावडे यांनी सुवर्णपदक पटकाविले आहे. या दोन्ही खेळाडूंनी शिवाजी विद्यापीठाला सुवर्णपदक मिळवून देण्यात उल्लेखनीय कामगिरी बजाविली आहे. खेळाडूंना शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसन कुराडे, सचिव डॉ. अनिल कुराडे, उपाध्यक्ष ॲड. दिग्विजय कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम.कदम यांचे प्रोत्साहन तर क्रीडा विभाग प्रमुख डॉ. राहुल मगदूम, प्रा. जयवंत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

10 JAN 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ मिक्स संघाचा रौप्य पदकावर कब्जा




कोल्हापूर : पश्चिम-दक्षिण आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत उठावदार कामगिरी करत अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या शिवाजी विद्यापीठ संघातील नेमबाजांसोबत प्रशिक्षक प्रा. डॉ. नीलेश पाटील व संघ व्यवस्थापक डॉ. धनंजय पाटील.

प्रतिनिधी
कोल्हापूर

हरियाणा येथील कुरुक्षेत्र विद्यापीठाच्या शुटिंग रेंजवर झालेल्या पश्चिम-दक्षिण विभागीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत महिला व पुरुष अशा मिक्स संघाने रौप्य पदक पटकावले. पदक प्राप्त संघाची कुरुक्षेत्र विद्यापीठातीलच शुटिंग रेंजवर होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेमाबाजी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या मिक्स संघाने १० मीटर पिस्तल प्रकारातून स्पर्धेत प्रतिनिधीत्व केले. या संघात फिझा देसाई, (छत्रपती शहाजी महाविद्यालय), श्रेयस उपाध्ये (केएसडब्ल्यू कॉलेज सांगली) यांचा समावेश होता. स्पर्धेच्या नियोजित ४०० गुणांपैकी फिझाने १८८ व श्रेयसने १८९ गुण मिळवत रौप्य पदकाला गवसणी घातली. वैयक्तिक गटातून स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेल्या तेजस ढेरेने (भोगावती महाविद्यालय, कुरुकली) १० मीटर पिस्तल या प्रकारात उत्कृष्ट कामगिरी केली. तसेच स्पर्धेच्या सांघिक पुरुष गटात श्रेयस उपाध्ये (केएसडब्ल्यू कॉलेज सांगली), समर्थ मंडलिक (न्यू कॉलेज), रोहन हुजरे (भोगावती महाविद्यालय) यांच्या संघाने तर महिला गटात कनक शिंदे (डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, कसबा बावडा), लावण्या नलवडे (राजाराम कॉलेज) व फिझा देसाई या तिघींच्या संघाने १० मीटर पिस्तल प्रकारात उत्तम कामगिरी केली. वरील कामगिरीची दखल घेऊन कुरुक्षेत्र विद्यापीठातील शुटिंग रेंजवर होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेसाठी तेजस ढेरे याच्यासह पुरुष व महिला संघालाही पात्र ठरवले आहे. या सर्व नेमबाजांना शिवाजी विद्यापीठ संघाचे प्रशिक्षक प्रा. डॉ. नीलेश पाटील (राधानगरी महाविद्यालय), संघ व्यवस्थापक डॉ. धनंजय पाटील (आजरा महाविद्यालय) यांच्यासह कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे व क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

- पश्चिम-दक्षिण विभागीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत कामगिरी
- अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड, उत्कृष्ट कामगिरी केलेला शिवाजी विद्यापीठ पुरुष व महिला संघही पात्र

10 JAN 2024

जनसंपर्क कक्ष

तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'केएमसी'च्या खेळाडूंची कौतुकास्पद कामगिरी

प्रतिनिधी

कोल्हापूर

केएमसी कॉलेजच्या तिघांनी शालेय व महाविद्यालयीन पातळीवर झालेल्या विविध क्रीडा स्पर्धामध्ये कौतुकास्पद कामगिरी केली.



**कोल्हापूर : शालेय व महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांमध्ये कौतुकास्पद कामगिरी केलेल्या तृप्ती, नागेश व अंकिताचा केशव जाधव, डॉ. बाबासाहेब उलपे यांच्या हस्ते सत्कार झाला. सोबत डॉ. राम पवार व जितेंद्रजित हराळे.**

सांगली जिल्हा क्रीडा संकुलात राज्यस्तरीय शालेय १९ वर्षाखालील मुलींच्या ज्युदो स्पर्धेत तृप्ती गुरवने ४८ किलो वजन गटात सुवर्ण पदक जिंकले. तिने नाशिकमधील ज्युदोपटूला पराभूत केले. तिची राजस्थान येथील राष्ट्रीय शालेय ज्युदो स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली. शिवाजी विद्यापीठात झालेल्या आंतरविभागीय महाविद्यालयीन रग्बी स्पर्धेत नागेश दिवसेने आक्रमक खेळाचे प्रदर्शन केले. तो आता अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रग्बी स्पर्धेत प्रतिनिधीत्व करेल. अंकिता जाधवने पंजाब येथील पश्चिम–दक्षिण आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेत ६३ किलो गटात पाचवा क्रमांक पटकावला. शिवाजी विद्यापीठ संघातून अंकिताने स्पर्धेत प्रतिनिधीत्व केले होते. तिची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली. या तिघांना महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त केशव जाधव, प्राचार्य डॉ. बाबासाहेब उलपे, पर्यवेक्षक प्रा. संदीप गावित, प्रा. अनिल मुडे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. राम पवार व प्रशिक्षक संदीप पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 JAN 2024

पुण्यनगरी

# अति तेथे माती



**विज्ञान-तंत्रज्ञान**

डॉ. व्ही.एन. शिंदे

**सध्या कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा आर्टिफिशियल इंटेलिजंस हा सर्वत्र चर्चेचा विषय बनला आहे. या तंत्रामुळे कामगारावर अवलंबून राहण्याचे दिवस संपले आहेत. संप, आंदोलन यापासून उद्योग जगत मोकळे होणार, असेही म्हटले जाते. यंत्रमानव हे यातून आलेले एक तांत्रिक प्रतिमान. याचा उपयोग आज अनेक देशांत होत आहे. तो वाढत जाणार हे निश्चित आहे. याचे कारण म्हणजे, मानव सर्व काही पैशात मोजतो. पैसा आणि त्रास कमी असणारी कोणतीही गोष्ट माणसाने आजवर नाकारली नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता हे यातील सर्वोत्तम अशीच माणसाची धारणा आहे आणि याच भ्रमात तो वावरत आहे.**

तसे तर गतशतकापासून वापरली जाणारी यंत्रेही विशिष्ट कामासाठी तयार केलेले यंत्रमानवच होती. मानवाने करायची कामे ही यंत्रे करू लागली. मात्र, यंत्र चालवण्यासाठी माणूस गरजेचा होता. उदाहरणार्थ डोंगर फोडून रस्ता बनवायचा आहे. पूर्वी जेसीबी आणि पोकलँडचा शोध लागण्यापूर्वी या कामासाठी शेकडो हात, अनेक दिवस काम करायचे. मात्र, यंत्रांच्या शोधानंतर एक चालक या यंत्राच्या सहाय्याने शेकडो हातांचे काम करू लागला. तेही कमी दिवसात. त्यामुळे कंत्राटदाराला शेकडो मजूर शोधत बसण्याची गरज उरली नाही. खोदकाम केलेले साहित्य उचलण्यासाठीही यंत्रच मदत करते. मात्र, यामध्ये यंत्राला चालवणारा कोणीतरी मानव असे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा या यंत्रांमध्ये वापर सुरू झाला आणि आता चालकाचीही गरज संपली. स्वयंचलित वाहनेही आता नवा अर्थ घेऊन बाजारात येत आहेत. आपण फक्त गाडीत जाऊन बसायचे आणि कोठे जायचे, हे प्रणालीमध्ये भरायचे. आपण हात पाय न हलवता ते स्वयंचलित वाहन आपणास इच्छित स्थळी पोहोचवते. रस्त्यात अडथळा आला, वाहतूक कोंडी झाली, सर्व काही ते यंत्र पाहून घेते. त्यावर उपाय शोधते आणि योजतेही. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून यंत्रमानवाला स्वतःचे विचार आणि भावना देण्यात जग हळूहळू यशस्वी होत आहे. बोलक्या यंत्रमानव सोफियाचे जगभर मोठे कौतुक होत आहे. कसलेल्या नेत्यासारखी ती मुलाखतकर्त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देते, हे पाहून आयआयटीचे विद्यार्थीही आश्चर्यचकित झाले होते.

यंत्रमानवाच्या उपयुक्ततेमुळे मानवाचे श्रम आणि वेळ दोन्ही वाचले आहेत. त्यांच्या उपयुक्ततेमुळे त्यांचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. यंत्रमानवाची घनता ही दर १० हजार कामगारांमागे किती यंत्रमानव आहेत यावर मोजली जाते. २०१५ पर्यंत यंत्रमानवाची घनता ही ६६ होती. मात्र, पुढील केवळ पाच वर्षांत ही घनता १२६ इतकी झाली आहे. गंमत म्हणजे आशिया हा या घनतेमध्ये किंवा यंत्रमानवाच्या वापरामध्ये सर्वात पुढे आहे. आशिया खंडात ही घनता १३३ इतकी भरते. युरोप आणि अमेरिकेमध्ये ती अनुक्रमे १२३ आणि १११ आहे.

सर्वाधिक यंत्रमानवाचा वापर करणाऱ्या देशामध्ये दक्षिण कोरिया अग्रस्थानी आहे. २०२० च्या 'इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रोबोटिक्स'च्या आकडेवारीनुसार दक्षिण कोरियामध्ये १० हजार कामगारांमागे ९३२ यंत्रमानव आहेत. २०१५ पासून यात दरवर्षी १० टक्के वाढ होत आहे. दुसरा क्रमांक हा सिंगापूरचा लागतो. सिंगापूरमध्ये १० हजार कामगारांमागे ६०५ यंत्रमानव आहेत. विशेष म्हणजे सिंगापूरमधील यंत्रमानवांच्या वापरामध्ये घट आढळून आली आहे. जपान उद्योग त्यातही इलेक्ट्रॉनिक उद्योगात अव्वलस्थानी असला तरी जपानमध्ये यंत्रमानवाची घनता केवळ ३९० इतकी आहे. चौथा क्रमांक हा जर्मनीचा लागतो. जर्मनीतील घनता ३७१ आहे. जर्मनीपाठोपाठ स्वीडनचा क्रमांक लागतो आणि तेथील घनता २८९ आहे. यंत्रमानवाच्या २७५ घनतेसह हाँगकाँग सहाव्या क्रमांकावर आहे. अमेरिकेतील यंत्रमानवाची घनता ही २५५ असून हा देश सातव्या क्रमांकावर आहे. आठव्या क्रमांकावर असणाऱ्या तैवानमधील घनता २४८ आहे. चीन आणि डेन्मार्कचा क्रमांक नववा असून तेथील घनता २४६ आहे. दहाव्या क्रमांकावरील इटलीमध्ये यंत्रमानवाची घनता २२४ इतकी आहे.

यंत्रमानव आणि चॅट-जीपीटी या दोन तंत्रामुळे जगात मोठी अस्वस्थताही आहे. यंत्रमानवामुळे कष्ट कमी होत आहेत. चॅट-जीपीटी तुमच्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तरे द्यायला सज्ज आहे. एखाद्या विषयावर तुम्हाला किती मिनिटांचे भाषण तयार करून हवे ते सांगायचे, मिनिटात तुमच्यासमोर भाषणाचा मसुदा येतो. पूर्वीचे संदर्भ शोधणे, आवश्यक मजकुराचे टिपण काढणे सगळे या नव्या तंत्रामुळे कालबाह्य झाले आहे. मात्र, या सर्व गोष्टींमुळे मानवी बुद्धिमत्तेचे महत्त्व कमी होत असल्याचे अनेक विद्वानांचे मत आहे, ते खरेही आहे. सर्जनशिलता आणि निर्मितीक्षमतेला हे आव्हान आहे, हे म्हणणे मात्र आजमितीला तितकेसे खरे नाही. अर्थात, भविष्यात हे घडणार नाही असे नाही. भविष्यात मानवी बुद्धिमत्तेपेक्षा अधिक बुद्धिमान आणि स्वतंत्र विचार करणारे यंत्रमानव किंवा तंत्रज्ञान निश्चितच विकसित होईल यात शंका नाही. हा दिवस ज्या दिवशी उगवेल, तो दिवस निश्चितच मानवासाठी घातवार असणार आहे. असे म्हणण्याचे कारण म्हणजे नुकतीच घडलेली घटना. एका कामगारावर यंत्रमानवाने हल्ला केल्याची ती बातमी आहे. अर्थात, यंत्रमानवाने मानवावर केलेला हा पहिलाच हल्ला नाही. पाच वर्षांपूर्वी चीनमध्येही असाच यंत्रमानवाने हल्ला केला होता. चीनच्या झुजो प्रांतातील कारखान्यात एका कामगाराच्या शरीरात यंत्रमानवाने दहा रॉड घुसवले होते. या बातमीला त्यावेळी मोठी प्रसिद्धी मिळाली होती. मागील आठवड्यात झालेल्या हल्ल्याची बातमीही प्रसिद्ध झाली. मात्र, इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ही बातमी जवळपास लुप्त झाली आहे. यंत्रमानव हा मानवाप्रमाणे विचार करू लागला तर मानवाप्रमाणेच त्याच्या मनातही सर्व प्रकारच्या भावभावना निर्माण होतील. षडरिपूंचा प्रवेश यंत्रमानवामध्येही होईल. त्यातून यंत्रमानवालाही राग येणार आणि त्यामध्ये भविष्यात तो स्वतःच असा हल्ला करू शकेल. आजवर लागलेल्या सर्व शोधांचे फायदेच समाजासमोर मांडण्यात येतात. त्याची वाईट बाजू सांगण्याचा, समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न क्वचितच होतो. यंत्रमानव आणि कृत्रिम बुद्धिमत्तेतील प्रगतीबाबतही असेच सुरू आहे. आज यांचे केवळ गोडवे गाईले जात आहेत, मात्र कृत्रिम बुद्धिमत्तेचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणात संभवतात. विज्ञान आणि तंत्रज्ञान मानवाच्या सुखासाठी विकसीत होत असताना, सारासार विवेक जागृत नाही ठेवला, तर 'अति तेथे माती' होईल, हे निश्चित!

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००